ePaper
वर्ष - 8 । अंक - 364 | UDYAM-MH-26-0158827
महाईन्यूज ™
www.mahaenews.com | मंगळवार, दि. 12 ऑगस्ट 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## खेड अपघातप्रकरणी सरकारकडून मदत जाहीर, चालक ताब्यात




### आतील पानांत
- ऐतिहासिक कामगिरीची आस!
- सिराजबाबत खबरदारी गरजेची!
- TRP चा उच्चांक, सगळे रेकॉर्ड मोडले!
- शेतकऱ्यांच्या हिताशी तडजोड नाही!


### काँग्रेसचा 'ईव्हीएम' वर हल्लाबोल | शरद पवारांच्या 'गुगली' मुळे राजकीय वातावरण तापले

# शरद पवारांचे पुन्हा 'अर्धसत्य'!

### 'वंचित बहुजन आघाडी' देखील संतप्त : पवारांचा हेतू स्पष्ट नाही ! उपस्थित केले पाच मोठे प्रश्न

।नागपूर / नवी दिल्ली ।
प्रतिनिधी । महाईन्यूज

**निवडणूक आयोग आणि 'ईव्हीएम' मशीन वर अविश्वास दाखवत काँग्रेसचे नेते राहुल गांधी हे हल्लाबोल करत असताना राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शरद पवार यांनी नेहमीप्रमाणे 'अर्धसत्य' सांगून खळबळ उडवून दिली आहे. शरद पवार यांच्या 'गुगली' मुळे राजकीय वातावरण चांगलेच तापले असून 'वंचित बहुजन आघाडी' ने संताप व्यक्त करून पाच प्रश्न उपस्थित केले आहेत. शरद पवार यांचा हेतू निश्चितपणे चांगला आणि स्पष्ट नाही, असा आरोप 'वंचित बहुजन आघाडी' ने केला आहे.**



### शरद पवार यांचे मोठे वक्तव्य

शरद पवार यांनी विधानसभा निवडणुकीबाबत बोलताना मोठे वक्तव्य केले आहे, निवडणुकीच्या काळात आमच्या आघाडीला जास्त जागा मिळवून देण्याबाबत दोन जण भेटले होते, त्यांची आपण राहुल गांधी यांच्याशी गाठ घालून दिली होती, असे 'अर्थसत्य' शरद पवार यांनी जाहीर केले आहे. त्यावर प्रतिक्रिया देताना आता 'वंचित बहुजन आघाडी' कडून जोरदार हल्लाबोल करण्यात आला आहे.

### शरद पवार स्टाईल !

शरद पवार यांनी टाकलेला हा गुगली म्हणजे त्यांचे टिपिकल राजकारण आहे, असे राजकीय तज्ज्ञांना वाटते. खोटे बोल पण रेटून बोल, ही शरद पवारांची नेहमीचीच भूमिका असते, असेही अनेक नेत्यांनी म्हटले आहे. शरद पवार हे बोलून गेले, पण त्यांनी काहीही स्पष्ट केलेले नाही, त्यामुळे राजकारणात संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे.

### आधी मोठे यश, मग अपयश

लोकसभा निवडणुकीमध्ये राज्यात 'महाविकास आघाडी' ला मोठे यश मिळाले होते, मात्र, विधानसभा निवडणुकीत हे यश त्यांना टिकवता आले नाही, विधानसभा निवडणुकीमध्ये 'महायुती' ने जोरदार पुनरागमन केले. 'महायुती' चे राज्यात तब्बल २३२ उमेदवार विजयी झाले, तर महाविकास आघाडीला अवघ्या ५० जागांवरच समाधान मानावे लागले होते. दरम्यान, त्यानंतर सातत्याने 'महाविकास आघाडी' कडून 'ईव्हीएम' च्या मुद्द्यावरून आरोप सुरू आहेत.

### नेमके काय म्हणाले, पवार

खळबळ उडवून देणारे शरद पवार यांचे वक्तव्य नेमके काय होते ते पाहू या. विधानसभा निवडणुकीपूर्वी दोन लोक माझ्याकडे आले होते, ते मला २८८ जागांपैकी १६० जागा निवडून आणण्याची 'गॅरंटी' देत होते, १६० जागांवर ते मतांची फेरफार करण्याबाबत मला सांगत होते' असा दावा शरद पवार यांनी केला आहे. या दोन लोकांना आपण काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांच्याकडे घेऊन गेलो, असाही गौप्यस्फोट शरद पवार यांनी केला आहे. त्यांच्या या वक्तव्यामुळे आता पुन्हा एकदा राज्यात वातावरण तापले आहे. यावरून आता 'वंचित बहुजन आघाडी' ने ट्विट करत शरद पवार यांना काही प्रश्न विचारले आहेत.

## देवेंद्र फडणवीस यांचा निशाणा..

शरद पवार हे इतके दिवस गप्प का बसले आहेत ? असा प्रश्न मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपस्थित केला आहे. राहुल गांधी यांची भेट झाल्यापासून पवार साहेब सुद्धा काहीतरी बिन बुडाचे आणि पुराव्याशिवाय बोलायला शिकले असावेत. राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगावर अविश्वास दाखवण्याचे सत्र सुरू केल्यानंतर शरद पवार हे बोलायला लागले आहेत असेही फडणवीस म्हणाले. काहीतरी कपोलकल्पित, वस्तुस्थिती न पाहता बोलून आपले महत्त्व वाढवायचे, हा राहुल गांधी यांचा गुण आता शरद पवारांकडे आलेला दिसतो, असा टोमणाही फडणवीस यांनी लगावला आहे.

### 'वंचित'च्या ट्विटमध्ये काय?

'शरद पवार जी तुम्ही पुन्हा अर्धसत्य सांगून निघून गेलात! दोन लोक तुम्हाला भेटले, ज्यांनी तुम्हाला महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत हेराफेरी करण्याची 'ऑफर' दिली आणि सांगितले की, ते तुम्हाला विधानसभेच्या १६० जागा जिंकून देतील. पण, तुम्ही म्हणत आहात की, तुम्हाला त्यांची नावे माहीत नाहीत.

### वंचित बहुजन आघाडीचे प्रश्न..

या आघाडीने शरद पवार यांना पुढील प्रश्न विचारले आहेत. ही गोष्ट सांगा की, तुम्ही पोलिसांकडे किंवा निवडणूक आयोगाकडे तक्रार का केली नाही ? तुम्ही या दोघांविरुद्ध तक्रार केली नाही. पण, तुम्ही त्यांना राहुल गांधींकडे निवडणूक हेराफेरीचा सौदा करण्यासाठी घेऊन गेलात, ही वस्तुस्थिती आहे.

### नावे उघड होऊ शकतात..

पवारसाहेब, जर तुम्हाला त्या दोघांची नावे आणि पत्ता माहीत नसेल, तर जेव्हा लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या घरात प्रवेश हा त्यांची नावे न लिहिताच झाला असेल ? त्यांची नावे प्रवेश करतांना नोंदणीतून उघड होऊ शकतात, आमचे आव्हान स्वीकारून ती नावे जाहीर करा.

### पवारांचे हेतू स्पष्ट नाहीत..

शरद पवार यांचे हेतू स्पष्ट नव्हते, म्हणूनच तुम्ही त्यांना राहुल गांधींकडे घेऊन गेलात. तुम्हाला माहीत होते की, महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत हेराफेरी होऊ शकते. मग, तुम्ही गप्प का होता? आणि मुख्य म्हणजे कोणाच्या सांगण्यावरून तुम्ही इतके दिवस गप्प राहिलात ?

### तुम्ही बोललात, राहुल गप्प का?

राहुल गांधींनी तुम्ही ज्या गोष्टी सांगत आहात, याची पुष्टी करावी, असे आमचे आवाहन आहे. तुम्ही बोललात पण राहुल गांधी गप्प का, हा खरा प्रश्न आहे. मुख्य मुद्दा म्हणजे राहुल गांधी वरील सर्व प्रश्नांची पुष्टी करतील का?

### भाजपाचाही निशाणा..

वंचित बहुजन आघाडीच्या वतीने शरद पवार यांना ट्विटच्या माध्यमातून प्रश्नांचा भडीमार करण्यात आला आहे, दुसरीकडे भाजपा ने देखील यावरून पवारांवर निशाणा साधला आहे.

प्रशिक्षण कार्यशाळा

## प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी कार्यकर्त्यांचे कान टोचले

# संघभावना, संघटनेत काँग्रेस कमी!

## सक्षम नेतृत्व काँग्रेसची जमेची बाजू

| पुणे |
प्रतिनिधी : महाईन्यूज

**'गावोगावी काँग्रेसचा चिवट कार्यकर्ता आहे. जाज्वल इतिहास आणि विचार, तसेच सक्षम नेतृत्व ही काँग्रेसची जमेची बाजू आहे. मात्र, कृती, संघभावना आणि संघटनेत काँग्रेस कमी पडत आहे. मी-मी केल्याने अनेक त्रिज्या निर्माण झाल्या आहेत. ही उणीव भरून काढावी लागेल,' असे स्पष्ट मत काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी येथे सोमवारी व्यक्त केले. 'प्रदेश कार्यकारिणीच्या प्रशिक्षण कार्यशाळेच्या माध्यमातून ही कमतरता दूर होईल, असा विश्वास आहे,' असेही सपकाळ म्हणाले.**



काँग्रेसच्या नवनियुक्त प्रदेश पदाधिकाऱ्यांच्या दोन दिवसीय कार्यशाळेला सोमवारी खडकवासला येथे सुरुवात झाली. या कार्यशाळेचे उद्घाटन सपकाळ यांच्या हस्ते झाले. त्या वेळी ते बोलत होते. विधानसभेतील गटनेते विजय वडेट्टीवार, विधान परिषदेतील गटनेते सतेज उर्फ बंटी पाटील, काँग्रेस कार्य समितीचे सदस्य आणि माजी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात, माजी मंत्री डॉ. विश्वजित कदम, अखिल भारतीय काँग्रेस समितीचे सचिव बी. एम. संदीप, कुणाल चौधरी, यू. बी. व्यंकटेश, उपाध्यक्ष संघटन आणि प्रशासन अॅड. गणेश पाटील, वरिष्ठ प्रवक्ते अतुल लोंढे, प्रदेश काँग्रेसचे खजिनदार अॅड. अभय छाजेड आणि उपाध्यक्ष मोहन जोशी या वेळी उपस्थित होते.'एकसंघ राहणे ही काँग्रेसची कार्यपद्धती आहे. कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांचे ते उत्तरदायित्व आहे. सध्या काँग्रेसमध्ये कोण कोणत्या गटाचा आणि कोण कोणत्या नेत्याच्या जवळचा असा प्रकार दिसत नाही. मात्र, येत्या काळात काही दक्षता घ्यावी लागेल. 'ओरिएंटेशन', 'इंट्रोडक्शन' आणि 'इंटरअॅक्शन' या त्रिसूत्रीवर काम करावे लागणार आहे. निवडणुकीपुरते जागे व्हायचे आणि निवडणुकीनंतर सर्व संपले, हा काँग्रेसचा विचार नाही, हे लक्षात घ्यावे लागेल,' असे सपकाळ यांनी सांगितले.ते म्हणाले,' काँग्रेसची भूतकाळातील स्थिती, वर्तमानातील अस्तित्व आणि भविष्यातील परिस्थितीचा विचार आता करावा लागणार आहे. दहा हजार कोटी रुपये खर्च करून काँग्रेस नेते राहुल गांधी यांची प्रतिमा डागाळण्याचा प्रयत्न करण्यात आला. तो हाणून पाडला. राहुल गांधी यांच्या रूपाने पक्षाला सक्षम नेतृत्व मिळाले आहे. त्यामुळे पक्षाचा विचार तळागाळापर्यंत पोहोचवावा लागेल. नवीन कार्यकारिणी पक्षाला काय देणार याचा विचार करावा लागणार आहे.'भविष्यात काँग्रेसपुढे मोठी आव्हाने आहेत. सत्तेसाठी संघटन नको, तर संघटनेत काम करून सत्ता प्राप्त करावी लागेल,' असे सांगून विजय वडेट्टीवार म्हणाले, 'धार्मिक भावनांच्या माध्यमातून राजकारण केले जात आहे. लोकांच्या मनात प्रचंड राग आणि चीड आहे, वेदना आहेत. संघटनेत काम करणाऱ्यांनी त्या समजून घेऊन लोकांपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. सध्या काही ठरावीक पदाधिकारी आंदोलनात दिसतात. कामाने आणि कर्तृत्वाने ओळख निर्माण करण्याची जबाबदारी नव्या कार्यकारिणीवर आहे. धार्मिक ध्रुवीकरणामुळे अन्य मागासवर्गीय (ओबीसी) मतदार आपल्यापासून दूर गेले आहेत. त्यांच्यात विश्वास निर्माण करून त्यांना पुन्हा काँग्रेसबरोबर आणण्याची गरज आहे.'काँग्रेसच्या नवनियुक्त प्रदेश पदाधिकाऱ्यांच्या दोन दिवसीय कार्यशाळेला सोमवारी खडकवासला येथे सुरुवात झाली. या कार्यशाळेचे उद्घाटन सपकाळ यांच्या हस्ते झाले. त्या वेळी ते बोलत होते. विधानसभेतील गटनेते विजय वडेट्टीवार, विधान परिषदेतील गटनेते सतेज उर्फ बंटी पाटील, काँग्रेस कार्य समितीचे सदस्य आणि माजी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात, वरिष्ठ प्रवक्ते अतुल लोंढे, प्रदेश काँग्रेसचे खजिनदार अॅड. अभय छाजेड आणि उपाध्यक्ष मोहन जोशी या वेळी उपस्थित होते.'एकसंघ राहणे ही काँग्रेसची कार्यपद्धती आहे. कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांचे ते उत्तरदायित्व आहे.

### ओबीसी काँग्रेसपासून दूर

सध्या काँग्रेसमध्ये कोण कोणत्या गटाचा आणि कोण कोणत्या नेत्याच्या जवळचा असा प्रकार दिसत नाही. मात्र, येत्या काळात काही दक्षता घ्यावी लागेल. 'ओरिएंटेशन', 'इंट्रोडक्शन' आणि 'इंटरअॅक्शन' या त्रिसूत्रीवर काम करावे लागणार आहे. निवडणुकीपुरते जागे व्हायचे आणि निवडणुकीनंतर सर्व संपले, हा काँग्रेसचा विचार नाही, हे लक्षात घ्यावे लागेल,' असे सपकाळ यांनी सांगितले.

# परवानगी न घेता बसथांब्यांची उभारणी

## ठेकेदारवर कारवाईची 'मनसे'ची आयुक्तांकडे मागणी

| पुणे |
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या (पीएमपीएल) बसथांब्यांची उभारणी करण्यासाठीचे काम मिळालेल्या ठेकेदाराने महापालिकेच्या पथ विभाग आणि आकाशचिन्ह विभागाची परवानगी न घेता आणि शुल्क न भरता बसथांबे उभारल्याचे उघडकीस आले आहे. संबंधित ठेकेरादारवर कारवाई करण्याची मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने (मनसे) महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांच्याकडे केली आहे.**



'पीएमपीएल'ने संबंधित ठेकेदाराला पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधील ३०० बसथांबे उभारण्याचे काम दिले आहे. बांधा, वापरा, हस्तांतरीत करा (बीओटी) तत्वावर १५ वर्षांसाठी हे काम देण्यात आले आहे. बसथांबे उभारताना महापालिकेच्या पथ आणि आकाश चिन्ह विभागाची परवानगी आणि याबाबतचे शुल्क महापालिकेकडे भरण्यात आले आहे का, याबाबतची माहिती मनसेचे राज्य सरचिटणीस हेमंत संभूस यांनी माहितीच्या अधिकारात मागविली होती.

त्यानुसार ठेकेदाराने परवानगी घेतली नसून शुल्क भरले नसल्याची माहिती महापालिकेकडून देण्यात आली. संभूस यांनी सोमवारी महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांची भेट घेऊन या प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी केली.'पुणे महापालिका, पिंपरी चिंचवड महापालिका आणि पुणे महानगर विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) हद्दीत बसथांबे उभारण्यासाठी २०२३ मध्ये 'पीएमपीएल'ने निविदा प्रक्रिया राबविली होती. हे काम एका ठेकेदार कंपनीला मिळाले. या कंपनीचे सध्याचे बदलले आहे. पीएमपीएमएल आणि या ठेकेदार कंपनीमध्ये करार झाला होता.

### प्रकरणी चौकशी कारवाई करावी

विभागाकडून परवानगी घेणे आवश्यक होते. त्यासाठी संबंधित विभागांकडे शुल्क भरणे गरजेचे होते. मात्र, या कंपनीने कोणत्याही विभागाची परवानगी घेतली नसल्याची माहिती महापालिकेने दिली आहे.' असे संभूस यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. 'बस थांबे उभारताना संबंधित कंपनीने परवानगी न घेतल्याने महापालिकेचे आर्थिक नुकसान झाले आहे. त्यामुळे या प्रकरणी चौकशी करून कारवाई करावी

**टेम्पोचा अपघात** श्रावण मासानिमित्त खेड तालुक्यातील कुंडेश्वर शिव मंदिरात दर्शनासाठी जाताना अपघात

# 10 महिला भाविकांचा जागीच मृत्यू!

## 29 महिला गंभीर जखमी; जखमींवर उपचार सुरू

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पुण्यातील खेड तालुक्यात सोमवारी भीषण अपघात झाला. खेड तालुक्याच्या पश्चिम भागातील कुंडेश्वर शिव मंदिराकडे जाताना घाट परिसरात ही घटना घडली. येथील प्रसिद्ध शिव कुंडेश्वर मंदिरात दर्शनासाठी जाणाऱ्या टेम्पोचा अपघात झाला आहे. या अपघातात सायंकाळपर्यंत 10 महिला भाविकांचा मृत्यू झाला असून 29 महिला गंभीर झाल्या आहेत.**





खेड तालुक्यातील पश्चिम पट्ट्यात असणारे शिव कुंडेश्वर मंदिर हे अतिशय प्राचीन असून अत्यंत प्रसिद्ध आहे. श्रावण महिन्यात येथे दर्शनासाठी दूरवरून भाविक येत असतात. आजचा तिसरा श्रावण सोमवार असून अपघात ठिकाणाहून जवळच असणाऱ्या पापळवाडी येथील काही महिला दर्शनसाठी कुंडेश्वर येथे जात असताना, घाटातून प्रवास करताना त्यांची गाडी दरीत पलटी झाली.

पाईट ते कुंडेश्वर मंदिर रस्त्यादरम्यान असणाऱ्या एका नागमोडी वळणावर पिकअप टेम्पो चढावरून खाली घसरला. यादरम्यान चालकाला टेम्पो वरील कंट्रोल मिळवणे अशक्य झाले. आणि हा टेम्पो रस्ता सोडून खाली येत शेतामध्ये पलटी झाला. टेम्पो ने दोन-तीन पलटी मारली. यात नऊ महिलांचा जागीच मृत्यू झाला. अपघाताची माहिती मिळताच खेड पोलीस तात्काळ घटना स्थळावर दाखल झाले. त्यांनी तपास ही सुरू आहे. या दुर्दैवी घटनेने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. मृत्यांचा आकडा वाढण्याचीही भिती व्यक्त केली जात आहे. देव दर्शनाला जात असतानाच हा अपघात झाल्याने सर्व जण हळहळ व्यक्त करत आहेत.

अपघातामध्ये शोभा ज्ञानेश्वर पापळ, सुमन काळूराम पापळ, शारदा रामदास चोरगे, मंदा कानिफ दरेकर, संजीवनी कैलास दरेकर, मिराबाई संभाजी चोरगे, बायडाबाई ऱ्यानेश्वर दरेकर, शकुंतला तानाजी चोरघे, फसाबाई सावंत, पार्वतीबाई पापळ या महिलांचा जागीच मृत्यू झाला आहे. दरम्यान खेड परिसरातील खाजगी हॉस्पिटलमध्ये 22 महिलांवर उपचार सुरू आहेत.

अपघात स्थळावर जागोजागी फुटलेल्या बांगड्यांचा खच, चपलांचा ढीग होता. सोबत आलेल्या आपल्या शेजारणीचा मृतदेह पाहून महिलांना अश्रू आनावर झाले होते. सैरभैर झालेल्या महिलांना काय करावे समजत नव्हते. यावेळी अपघात स्थळावरील आजूबाजूच्या नागरिकांनी जखमी महिलांना सावरले. खाजगी गाड्यांमधून तातडीने प्राथमिक उपचारांसाठी तातडीने पाईट येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल तसेच आजूबाजूच्या दवाखान्यांमध्ये हलवण्यात आले. या दुर्दैवी घटनेनं परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.


> “ नागमोडी वळणावरून टेम्पो थेट खाली घसरून आल्यानंतर टेम्पो पलटी झाला. यामध्ये महिला गंभीर रित्या जखमी होऊन मृत्यू पावल्या. याबाबत पुढील तपास सुरू आहे. जखमींना योग्य उपचार मिळतील याची देखील सूचना करण्यात आलेली आहे.
>
> **-दिगंबर सूर्यवंशी,** वरिष्ठ पोलीस निरीक्षक, म्हाळुंगे पोलीस स्टेशन

# पिंपरी-चिंचवडसह परिसरात गणेशोत्सवाची तयारी

## मूर्तीकार संजय कुंभार यांच्या ‘वेदांत आर्ट्स’च्या बाप्पांना उत्स्फूर्त प्रतिसाद

। पिंपरी-चिंचवड।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**गणेशोत्सवाची चाहूल लागताच घराघरात आनंदाचे वातावरण पसरू लागते. दरवर्षीप्रमाणे यंदाही पिंपरी-चिंचवडमधील वडमुखवाडी, चऱ्होली परिसरात वेदांत आर्ट्स कार्यशाळेत बनणाऱ्या श्री गणेशमूर्तींना गणेशभक्तांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.**



या कार्यशाळेचे मूर्तीकार संजय कुंभार हे गेल्या अनेक वर्षांपासून सुबक, आकर्षक आणि पर्यावरणपूरक गणेशमूर्ती तयार करत आहेत. त्यांच्या मूर्तींना स्थानिक ग्राहकांसह दूरवरूनही मागणी असते. संजय कुंभार म्हणाले, “गणेशोत्सव हा महाराष्ट्रातील एक महत्वाचा सण आहे. भक्तांचा बाप्पावर असलेला विश्वास आणि प्रेम आम्हालाही मूर्ती घडवताना अधिक प्रेरणा देतो. आम्ही यंदाही विविध आकार आणि रंगसंगतींमध्ये आकर्षक मूर्ती तयार केल्या आहेत.”

‘लवकर बुकिंग करा’चा संदेश वर्षानुवर्षे सातत्याने उत्तम कलाकृती सादर करणाऱ्या संजय कुंभार यांच्या मूर्तीसाठी आगाऊ बुकिंगला सुरुवात झाली आहे. त्यामुळे गणेशभक्तांना त्यांच्या आवडत्या बाप्पाची मूर्ती वेळेत मिळवण्यासाठी लवकरात लवकर बुकिंग करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. सजावटीपासून ते बाप्पांच्या भावमुद्रांपर्यंत प्रत्येक मूर्तीमध्ये कलाकारांची मेहनत आणि भक्तिभाव स्पष्ट दिसून येतो.

> “ “गणेशमूर्ती बनवणं ही फक्त एक व्यवसायाची गोष्ट नाही; ती माझ्यासाठी एक साधना आहे. प्रत्येक मूर्ती घडवताना मी केवळ माती घडवत नाही, तर त्यात भक्तांचा विश्वास, श्रद्धा आणि बाप्पावरचं प्रेम मिसळत असतो. लहानपणापासून माझं बाप्पाशी एक अनोखं नातं जुळलेलं आहे. त्याच नात्याचं प्रतीक म्हणजे ही मूर्ती. दरवर्षी मी जसा बाप्पाला घडवतो, तसाच तोही मला घडवत असतो — अधिक संयमी, अधिक कल्पक, आणि अधिक जबाबदार बनवत असतो.
>
> **-संजय कुंभार,** मूर्तीकार.

## नाम हा परमात्म्याकडे जाण्याचा राजमार्ग »


श्रीब्रह्मचैतन्य महाराज गोंदवलेकर

**समाधान भगवंताशिवाय कोठेही नाही**

खरोखर, जे आपल्या बुद्धीला पटते आणि अनुभवाला येते, ते सत्य आहे असे धरून चालायला हरकत नाही; मग त्याच्या आड कोणीही येत असेल तर त्याची आपण पर्वा करू नये. पण ते सत्य अनुभवायला यायला आमची बुद्धी स्थिर पाहिजे. हल्ली जगात बुद्धिभेद फार झाला आहे; अशा वेळी माणसाची बुद्धी स्थिर रहाणे फार कठीण झाले आहे. अगदी अत्यंत सदाचाराने वागणाऱ्या माणसाचीसुद्धा बुद्धी केव्हा फिरेल हे सांगता येणार नाही. केवळ शास्त्र सांगते म्हणून अमुक एक सत्य आहे असे धरून चाला, असे मी म्हणत नाही; मी सांगतो तेच सत्य आहे असे तुम्ही म्हणा, असेही मी म्हणत नाही; तुम्ही आपल्या स्वत:च्या विचारानेच ठरवा की, जीवनात तुम्हाला समाधान पाहिजे आहे ना ? ते समाधान भगवंताशिवाय दुसरे कुठेही आपल्याला मिळणार नाही हे अगदी निश्चयाने ठरवा. एकदा तुमचा निश्यच कायम झाल्यावर तुमच्या आड कुणीही येऊ शकणार नाही; निश्चय मात्र कायम पाहिजे. या निश्चयाचे बळ किती विलक्षण असते म्हणून सांगू ! एका गावात एक पन्नास - साठीच्या वयाचा बुद्धिमान् पण कुत्सित वृत्तीचा माणूस रहात होता. वेडेवाकडे प्रश्न विचारून टवाळकी करण्यात त्याचा हातखंडा होता. एकदा एका साधूचे प्रवचन अगदी रंगात आले असताना एकदम मध्येच उभा राहून तो म्हणाला, " अहो बुवा, ती तुमची भक्तीबित्ती, ती बाजूला ठेवा, देशाला स्वातंत्र्य कधी मिळेल ते सांगा ! " त्यावर साधू शांतपणे बोलला, "ते मी सांगतो; पण आता तुमचे उतार वय झाले. काळ केव्हा झडप घालील याचा नेम नाही, तर आता मला सांगा, की प्रपंचाची उपाधी, देहाची व्याधी, आणि मृत्यूची मगरमिठी यांतून स्वातंत्र्य मिळवायचा काही विचार, प्रयत्न, तुम्ही केला आहे का ? " हा मार्मिक प्रतिप्रश्न ऐकून टवाळखोर चूप बसला, पण त्याचे विचारचक्र सुरू झाले. दुसऱ्या दिवशी तो त्या साधूला भेटून म्हणाला, " आजपर्यंत मी स्वत:चा विचार केलाच नाही. पण आता मी काय करू ते मला सांगा. " साधू बोलला, " दोन वर्षे मौन धरून नामस्मरण करावे. " त्या दिवसापासून त्याने दृढ निश्चयाने मौन धरले आणि नामजपाचा तडाखा लावला. मौनाचा अवधी संपल्यावर साधूची पुन्हा गाठ पडली तेव्हा तो इसम डोळ्यात पाणी आणून म्हणाला, " महाराज, मला सर्व मिळाले ! मला नामाने जे समाधान मिळाले त्यापुढे इतर सर्व गोष्टी रद्द आहेत. " निश्चयपूर्वक नामस्मरणाचे असे विलक्षण सामर्थ्य आहे !

बोधवचन:- नामी ठेवावे चित्त। तेच मानावे सत्य। हा निश्चय ठेवा मनात। मन होईल निभ्रांत॥



**'स्टेट'मेंट**

अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

# काँग्रेसची वाटचाल जीवघेण्या अहंकाराकडून आत्मघाताकडे!

**काँग्रेस पक्ष कसा भारी आणि मोदी सरकार कसे काळात निघाले आहे हे सतत दाखवण्याचा प्रयत्न देशातील मीडियाचा सुरू असतो. एकदोन यूट्यूब वाहिन्यांवर काँग्रेस पक्षाच्या संदर्भात भलतीच आशावादी आणि आशादायक अशी परिस्थिती असल्याचा आभास निर्माण करण्याचा प्रयत्न असतो. मोदी सरकार तिसऱ्या वेळी सत्तेवर येऊन एक वर्ष होऊन गेले आहे. पसंत नसलेल्या एखाद्या नवदांपत्याचा संसार मोडण्याची वाट बघत बसणाऱ्या 'बोटेमोडू' माणसांप्रमाणे काँग्रेस पक्षाची अवस्था झाली असून संसार काही मोडत नाही आणि कोणताही चांगला मुद्दा हातात येत नाही, ही काँग्रेस प्रमाणेच त्यांच्या चाहत्यांची अवस्था झाली आहे.**



**फक्त आंदोलने आणि टीकास्त्र...**

सध्या या पक्षाची देशातील अवस्था बघा. काँग्रेस पक्षाचे नेतृत्व चांगलेच अडचणीत आले आहे. राजकीय पक्षांनी केवळ आंदोलन केले आणि सरकारवर शक्य असेल तेव्हा सतत टीका केली म्हणजे आपली सत्ता परत येण्याचा मार्ग मोकळा झाला असे होत नाही ना. काँग्रेसच्या नेत्यांना हे कळायला हरकत नाही. पण, ते अहंकारामध्ये मशगुल असून त्यांची वाटचाल आत्मघाताकडे सुरू आहे, हे कोणाच्याही सहज लक्षात येईल.

**हिमालयात जाण्याचा विचार..**

१९७७ मध्ये काँग्रेसचा पराभव करुन जनता पक्ष सत्ताधारी झाला, तेव्हा इंदिरा गांधी आणि त्यांचे चिरंजीव संजय यांनी हिमालयात एखाद्या गावात जाऊन झोपडी बांधून राहण्याचा विचार सुरु केला होता. पण, जनता पक्षाच्या नेत्यांनी आणि बिहारमधील एका घटनेने त्यांना सत्तेकडे परतीची वाट दाखवली होती. जनता पक्षात सगळे नेते मोठे होते, पण सगळे पिकलेले आंबे कोणी एका वेळी खरेदी करीत नाही. त्या वेळी इंदिरा गांधी यांना नशिबाने आणि जनता पक्षातील फुटीर नेत्यांनी साथ दिली, म्हणून त्या परत सत्ताधारी झाल्या होत्या. पण, जबरदस्त बहुमत असूनही वर्षभरात इंदिरा गांधी यांची प्रशासन आणि पक्षावर असलेली पकड सैल झाली होती. त्यातच संजय गांधी यांचे अपघाती निधन झाल्याने त्या खचून गेल्या होत्या. पुढे इंदिरा गांधी यांच्या हत्येच्या पार्श्वभूमीवर झालेल्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाला ४०४ आणि नंतर १० अशा ४१४ जागा मिळूनही राजीव गांधी यांची पक्ष आणि सरकारवर असलेली पकड सैल झाली होती आणि त्यांचेच अर्थमंत्री विश्वनाथ प्रताप सिंग यांनी काँग्रेस पक्षाला दणका दिला होता, हा इतिहास देखील अगदी ताजाच म्हणावा लागेल !

**गेलेली सत्ता परत आली..**

१९९६ मध्ये काँग्रेसने गमावलेली सत्ता २००४ मध्ये परत आली, ती आघाडी सरकारच्या स्वरुपात. ती २००९ मध्ये टिकून राहिली, ती भाजपची तयारी नसल्यामुळे आणि भाजपच्या फाजील आत्मविश्वासामुळे! २०१४ मध्ये काँग्रेस पक्षाने अगोदरच हार मानली होती, पाच वर्षे विरोधक सत्ताधारी झाले, तरी २०१९ मध्ये आपणच आहोत, या भ्रमात काँग्रेसचे नेते होते. मग २०२४ मध्ये कथित 'इंडी' आघाडी झाली. पण तीही फारशी प्रभावी ठरली नाही. याचे कारण म्हणजे काँग्रेस नेतृत्वाची क्षमता, वकूब, कर्तव्यतत्परता आणि विश्वासार्हता !

**राहुल गांधी यांचा खळखळाट..**

चला तर, आता मूळ मुद्द्यावर येऊ. तीन- चार दिवसांपूर्वी राहुल गांधी यांनी विरोधी पक्षांच्या नेत्यांना घरी भोजनासाठी बोलावले आणि त्यांना मतदानाच्या संदर्भात बरेच नकाशे वगैरे दाखवले. निवडणूक आयोग आणि भारतीय जनता पक्षाच्या नावाने थयथयाट आणि खळखळाट केला. नंतर भोजनाचा कार्यक्रम असल्यामुळे आणि रसमलाई चांगली असल्याचे कळल्यामुळे कदाचित संजय राऊत वगैरे कंपनी शेवटच्या ओळीत का होईना, पण सगळे ऐकत थांबली असावीत. पण, सर्व विरोधी पक्षांनी राहुल गांधी यांना सर्वमान्य नेता म्हणून औपचारिक काय, पण अनौपचारिकपणे देखील मान्य केलेले नाही, हे लक्षात घ्यायला हवे !

**काँग्रेसचा बाजार उठत चालला..**

भारतीय राजकारणात सत्ताधारी पक्षाला मिळणारे मतदान ४० ते ४५ टक्के एवढेच असते. म्हणजे उर्वरित मते विरोधात असतात. ही सगळी एकत्र झाली तर सत्ताधारी पक्षाचा पराभव होऊ शकतो. पण, आपल्याकडे अनेक प्रादेशिक पक्ष आहेत आणि ते राष्ट्रीय पातळीवरील पक्षाला आपल्या राज्यात शिरु देण्याच्या विरोधात असतात. भाजपने हळूहळू काही प्रादेशिक पक्ष गुंडाळत आणले आहेत. पण, काँग्रेस पक्षाला ते शक्य झालेले नाही. केवळ गांधी-नेहरू घराण्याचा अभिमान आणि राहुल गांधी यांची प्रचंड कर्तृत्ववान नेता अशी 'इमेज' करण्याच्या प्रयत्नात काँग्रेसचा देशात बाजार उठत चालला आहे.

**पुण्याई संपत चालली...**

या सर्व पार्श्वभूमीवर काँग्रेस पक्षाची वाटचाल आत्मघाताकडे सुरु आहे, हे विधान धाडसाने करावे असेच आहे. मुख्य प्रश्न आहे तो गांधी घराण्याचा ! आपल्याला एखादे हॉटेल आवडते, पण गल्ल्यावर बसलेला खडूस म्हातारा आवडत नाही. म्हणून, आपण जाण्याचे टाळतो, तसे गांधी घराणे हे काँग्रेसच्या भावी वाटचालीत मोठा अडथळा आहे. मते मिळविण्यासाठी आवश्यक असलेली क्षमता गांधी घराण्याकडे फारशी उरलेली नाही. दोन भावंडे या दोन तोफा (?) मानल्या, तरी त्यातील नेमकी कोणती तोफ योग्य वेळी धमाका करु शकेल, याची खात्री नाही आणि महत्त्वाचे म्हणजे २००४ मध्ये अवघ्या १४६ जागा मिळूनही काँग्रेसचे सरकार केंद्रात आले, त्याला मुख्य कारण म्हणजे डाव्या पक्षांचा पाठिंबा आणि चार, पाच प्रादेशिक नेते. शिवाय त्या वेळी आंतरराष्ट्रीय प्रतिमा असलेल्या डॉ. मनमोहनसिंग यांना पंतप्रधान करण्यात आले, हा मोठा फायदा होता.

**राहुल गांधींची अवस्था काय?**

आज काँग्रेसला १४५ जागा मिळाल्या, तर राहुल गांधी यांना विरोधी पक्ष आपला नेता मानून पंतप्रधान करायला तयार होणार आहेत का ? म्हणजे नेतृत्व हा मोठा प्रश्न आहे. दुसरीकडे देशातील एकंदर परिस्थिती पाहता काँग्रेस पक्ष शंभर जागा पार करु शकेल, अशी परिस्थिती आज तरी नाही. राष्ट्रीय पातळीवर मोठी संधी असूनही राहुल गांधी यांना फार मोठा प्रभाव पाडता आलेला नाही.

**संसदेत गोंधळ हाच अजेंडा..**

कोणीतरी कार्यक्रम द्यायचे आणि संसदेत गोंधळ करीत राहायचा, या आधारे काँग्रेस बहुमताचा आकडा गाठू शकेल, ही शक्यता अजिबात दिसत नाही. या परिस्थितीत काँग्रेस पक्षाकडे कुठलेही विषय उरले नाहीत, तर पक्ष वाढणार कसा ? सध्या केंद्रात असलेले सरकार पाडून काही चमत्कार करण्याचा प्रयत्न देखील यशस्वी होण्याची परिस्थिती नाही. मग पक्ष टिकणार कसा ? योग्य पावले टाकून शांतपणे काही योजना केली नाही, तर काँग्रेस पक्षाची वाटचाल आत्मघाताकडे होत राहील, हे मात्र नक्की !

**काँग्रेसचा विचार थांबतो, तेव्हा..**

भारतीय राजकारणाच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या ज्येष्ठ नेत्याचे वक्तव्य मुद्दाम लक्षात घेण्यासारखे आहे. त्यांनी म्हटले आहे, की काँग्रेसचा विचार ज्या ठिकाणी थांबतो, त्या ठिकाणी मोदींचे विचार सुरू होतात. भारताच्या राजकारणातील हा फरक खूप काही सांगून जातो, याचा विचार करायला हवा !

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

जनआक्रोश आंदोलन

## शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचे टीकास्त्र

# भ्रष्टाचाऱ्यांसमोर मुख्यमंत्र्यांची अपरिहार्यता!

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**भ्रष्टाचाऱ्यांना बरोबर घेऊन सरकार चालविणे, ही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची अपरिहार्यता व एककलमी कार्यक्रम असल्याचे टीकास्त्र शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी सोमवारी सोडले. नवी दिल्लीत केंद्रीय निवडणूक आयोगाच्या कार्यालयावर 'इंडिया आघाडी'च्या वतीने मोर्चा काढण्यात आला. परंतु या आंदोलनादरम्यान केंद्र सरकारने विरोधकांशी केलेले वर्तन लांच्छनास्पद आणि लोकशाहीला काळिमा फासणारे असल्याची टीकाही ठाकरे यांनी केली.**

## राज्यभरात जनआक्रोश आंदोलन




### हे सरकार जनताभिमुख नाही

माझ्या मुख्यमंत्रीपदाच्या कार्यकाळात भ्रष्टाचाराचे आरोप झालेल्या मंत्र्यांना घरी पाठविण्यात आले होते. हे सरकार जनताभिमुख नाही. गृहराज्यमंत्री बार चालवीत आहेत. कृषीमंत्री शेतकऱ्यांची थट्टा करीत सभागृहात रमी खेळत होते. त्यांना आता आवडीचे खाते मिळाले आहे. महायुती सरकारने महाराष्ट्राला भ्रष्टाचारामध्ये देशात पहिल्या क्रमांकाचे राज्य म्हणून पंक्तीत बसविले आहे.

राज्य सरकारमधील भ्रष्टाचारी मंत्र्यांच्या हकालपट्टीच्या मागणीसाठी शिवसेनेने (उद्धव ठाकरे) सोमवारी राज्यभरात अनेक ठिकाणी जनआक्रोश आंदोलन केले. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे व आमदार आदित्य ठाकरे यांच्यासह पक्षातील वरिष्ठ नेते मुंबईतील आंदोलनात सहभागी झाले होते. 'विधिमंडळात आरोप करून व पुरावे देऊनही, राज्यपालांना निवेदन देऊनही भ्रष्टाचारी मंत्र्यांवर फडणवीस यांनी कारवाई केलेली नाही. सत्ता येते आणि जाते, पण इतिहासात तुमची नोंद काय होते, ते महत्वाचे असते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यात थोडा जरी अभिमान, स्वाभिमान व धैर्य असेल तर त्यांनी कोणाच्याही दबावाला न जुमानता कलंकित व भ्रष्टाचारी मंत्र्यांची मंत्रिमंडळातून हकालपट्टी करावी,' अशी मागणी ठाकरे यांनी जनआक्रोश आंदोलनात केली.माझ्या मुख्यमंत्रीपदाच्या कार्यकाळात भ्रष्टाचाराचे आरोप झालेल्या मंत्र्यांना घरी पाठविण्यात आले होते.

हे सरकार जनताभिमुख नाही. गृहराज्यमंत्री बार चालवीत आहेत. कृषीमंत्री शेतकऱ्यांची थट्टा करीत सभागृहात रमी खेळत होते. त्यांना आता आवडीचे खाते मिळाले आहे. महायुती सरकारने महाराष्ट्राला भ्रष्टाचारामध्ये देशात पहिल्या क्रमांकाचे राज्य म्हणून पंक्तीत बसविले आहे, असा आरोपही ठाकरे यांनी केला.दरम्यान, मंत्री 'हनीट्रॅप'मध्ये अडकतात, त्यांच्याकडे पैशांनी भरलेली बॅग असते, आदी प्रकारांची मला लाज वाटते, अशाप्रकारचे फलक घेऊन शिवसेना कार्यकर्त्यांनी राज्यभरात अनेक ठिकाणी निदर्शने आणि सरकारविरोधात घोषणाबाजी केली.भाजपबरोबर युतीत असताना त्यांच्या एका नेत्याने ईव्हीएम कसे हॅक करायचे, याचे प्रात्यक्षिक दाखविले होते, त्यांनी त्याचे नाव सांगितले नाही, पण तो आता नेता राहिलेला नाही. निवडणुकीत अमुक जागा जिंकून देतो, असा दावा करणारे प्रत्येक निवडणुकीआधी मला भेटतात. त्यांचे म्हणणे मी कधी गांभीर्याने घेतले नाही. पण गेल्या विधानसभा निवडणुकीआधी भेटलेले दोघेजण मला पुन्हा भेटले, तर हे कसे करतात, ते जाणून घेण्याची उत्सुकता आहे, असे ठाकरे यांनी सांगितले.मला फडणवीस यांची कीव येते. त्यांच्याकडे पाशवी बहुमत आहे, दिल्लीत बापजादे बसले आहेत, तरीही भ्रष्टाचारी मंत्र्यांना काढण्याची त्यांची हिंमत होत नाही. त्यांनी भ्रष्टाचार केलेला नाही, मग ते भ्रष्टाचाऱ्यांवर पांघरूण घालून बदनामी का ओढवून घेत आहेत?'राज्य सरकारमधील भ्रष्टाचारी मंत्र्यांच्या हकालपट्टीच्या मागणीसाठी शिवसेनेने (उद्धव ठाकरे) सोमवारी राज्यभरात अनेक ठिकाणी जनआक्रोश आंदोलन केले. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे व आमदार आदित्य ठाकरे यांच्यासह पक्षातील वरिष्ठ नेते मुंबईतील आंदोलनात सहभागी झाले होते. 'विधिमंडळात आरोप करून व पुरावे देऊनही, राज्यपालांना निवेदन देऊनही भ्रष्टाचारी मंत्र्यांवर फडणवीस यांनी कारवाई केलेली नाही. सत्ता येते आणि जाते, पण इतिहासात तुमची नोंद काय होते, ते महत्वाचे असते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यात थोडा जरी अभिमान, स्वाभिमान व धैर्य असेल तर त्यांनी कोणाच्याही दबावाला न जुमानता कलंकित व भ्रष्टाचारी मंत्र्यांची मंत्रिमंडळातून हकालपट्टी करावी.

# जेजुरीत पाच मजली नवीन इमारत खचली

## पोलीस बंदोबस्तात नगरपालिकेकडून इमारत जमीनदोस्त

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**जेजुरी येथील खोमणे आळी चौकामध्ये नव्याने बांधण्यात येत असलेल्या पाच मजली इमारतीचे बांधकाम रविवारी खचल्याने नागरिकांमध्ये घबराट पसरली. पोलीस बंदोबस्तात जेजुरी नगरपालिकेच्या पथकाने ही इमारत जमीनदोस्त केली.**




### नव्याने बांधकामांची घ्यावी

नव्याने सुरू असलेल्या बांधकामांची नगरपालिकेतून परवानगी घ्यावी अन्यता संबंधित बांधकामे तोडण्यात येणार आहेत.खोमणे आळी येथील मुख्य रस्त्यालगत पाच मजली इमारतीचे बांधकाम सुरू होते. हे बांधकाम पूर्ण होत आले होते. रविवारी काही कामगार पाचव्या मजल्यावर काम करीत असताना इमारतीच्या तळमजल्यात जोरात आवाज आला.

खोमणे आळी येथील मुख्य रस्त्यालगत पाच मजली इमारतीचे बांधकाम सुरू होते. हे बांधकाम पूर्ण होत आले होते. रविवारी काही कामगार पाचव्या मजल्यावर काम करीत असताना इमारतीच्या तळमजल्यात जोरात आवाज आला. त्यामुळे घाबरून ते खाली पळत आले. तेव्हा इमारतीचे तीन कॉलम तुटल्याचे दिसून आले. इमारतीला काही ठिकाणी तडे गेले होते.ही माहिती समजताच जेजुरी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दीपक वाकचौरे,नगरपालिकेचे मुख्याधिकारी चारुदत्त इंगोले घटनास्थळी दाखल झाले. यावेळी बांधकामाजवळील चारही रस्ते बंद करण्यात आले. आजूबाजूच्या रहिवाशांना सुरक्षित स्थळी हलवण्यात आले.इमारत झुकल्याने कधीही कोसळण्याची शक्यता असल्याने रात्रभर पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला. जेजुरी नगरपालिकेच्या पथकाने सकाळी साडेनऊ वाजता संबंधित इमारत पाडली.या इमारतीच्या बांधकामासाठी नगरपालिकेची परवानगी घेण्यात आली नव्हती. २४ एप्रिल रोजी बांधकाम थांबवण्याविषयी नगरपालिकेने जागामालकाला नोटीस दिली होती. तरीसुद्धा त्यांनी बांधकाम सुरू ठेवले होते, अशी माहिती मुख्याधिकारी चारुदत्त इंगोले यांनी दिली. जेजुरीतील जुन्या इमारतींचे संरचनात्मक लेखापरीक्षण करून त्याचा अहवाल नगरपालिकेत दाखल करावा, अशा सूचना नागरिकांना देण्यात आल्या.

विरोधकांचा मोर्चा

## आक्रमक आंदोलनाची राजकीय वर्तुळात चर्चा

# विरोधकांचा संसदभवनाबाहेर ठिय्या!

## आयोगाविरोधात जोरदार घोषणाबाजी




। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**निवडणूक प्रक्रियेतील कथित गैरप्रकारांबाबत संसदभवनातून मोर्चाने निवडणूक आयोगाच्या मुख्यालयात निघालेल्या विरोधकांच्या मोर्चाने सोमवारी राजधानीतील वातावरण ढवळून निघाले. खासदारांच्या घोषणाबाजीमुळे संसदेचा परिसर दणाणून गेला होता. पोलिसांनी मोर्चा अडविल्यानंतर खासदारांनी तेथेच ठिय्या देत सरकार आणि निवडणूक आयोगाविरोधात जोरदार घोषणाबाजी केली.**

संसदेच्या बाहेर काही अंतरावर असलेल्या परिवहन भवनासमोर पोलिसांनी मोर्चा अडविला. त्यानंतर समाजवादी पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव यांनी अडथळे उडी मारून पार केले आणि पोलिसांची नाकाबंदी तोडण्याचा प्रयत्न केला. तृणमूल काँग्रेसच्या खासदार महुआ मोईत्रा, काँग्रेसच्या सुष्मिता देव, संजना जाटव, ज्योतिमणी आदी काही खासदारांनी लोखंडी अडथळ्यांवर उभे राहून घोषणाबाजी केली. मोर्चामध्ये शिवसेना-ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत, द्रमुकचे टी. आर. बालू, तृणमूल काँग्रेसचे डेरेक ओब्रायन, 'आप'चे संजय सिंह, प्रियंका गांधी-वढेरा, सुप्रिया सुळे, कणिमोळी आदी खासदार सहभागी झाले होते. शिवसेनेच्या ठाकरे गटाच्या खासदारांनी अस्सल मराठीमध्ये केंद्रीय निवडणूक आयोगाच्या विरोधात घोषणाबाजी केली. काँग्रेसचे शशी थरूर आणि मनीष तिवारीही मोर्चात दिसले. मोर्चादरम्यान तृणमूल काँग्रेसच्या मिताली बाग, महुआ मोईत्रा या दोघी चक्कर आल्याने खाली पडल्या. समाजवादी पक्षाच्या संजना जाटव यांनाही नंतर रुग्णालयात नेण्यात आले.मोर्चानंतर लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी सरकारवर टीकेची झोड उठविली. "ही लढाई आता केवळ राजकीय राहिलेली नाही, देशाचा आत्मा संविधान आहे, त्यासाठी आम्ही लढत आहोत. एक व्यक्ती, एक मत हे संविधानाचे मूलभूत तत्त्व आहे. कर्नाटकमध्ये एक व्यक्ती, अनेक मत, अनेक व्यक्ती, अनेक मत असल्याचे दिसले आहे. आता निवडणूक आयोगाला लपून राहता येणार नाही. आम्ही सार्वजनिक केलेला (मतांच्या चोरीचा) माहिती-विदा आयोगाचाच आहे. तो चुकीचा असेल तर त्यांच्या संकेतस्थळावरून काढून टाकावा. देशाच्या वेगवेगळ्या मतदारसंघांमध्ये मतांची चोरी झालेली आहे. केंद्रीय निवडणूक

### पोलिसांनी मोर्चा अडविला

"नव्या मतदारांनी, तरुण मतदारांनी भाजपाला मतदान केलं असं सांगण्यात आलं. त्यासाठी फॉर्म ६ चा उपयोग करण्यात आला. पण ३३ हजार ६९२ नावांचा दुरुपयोग करण्यात आला. तुम्हाला एक उदाहरण देतो. शकुन राणी नावाची एक महिला आहे ही महिला ७० वर्षांची आहे. तिने दोन वेळा अर्ज क्रमांक ६ भरला. आता हे बघा शकुन राणी असं नाव आहे.

आयोग त्यांच्याकडील माहिती-विदावर नियंत्रण ठेवत आहेत. पण, तो बाहेर येईल. आम्ही ही माहिती लोकांसमोर आणू," असे राहुल गांधी यांनी मोर्चानंतर पत्रकारांशी संवाद साधताना सांगितले. संसदेच्या बाहेर काही अंतरावर असलेल्या परिवहन भवनासमोर पोलिसांनी मोर्चा अडविला. त्यानंतर समाजवादी पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव यांनी अडथळे उडी मारून पार केले आणि पोलिसांची नाकाबंदी तोडण्याचा प्रयत्न केला. तृणमूल काँग्रेसच्या खासदार महुआ मोईत्रा, काँग्रेसच्या सुष्मिता देव, संजना जाटव, ज्योतिमणी आदी काही खासदारांनी लोखंडी अडथळ्यांवर उभे राहून घोषणाबाजी केली. मोर्चामध्ये शिवसेना-ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत, द्रमुकचे टी. आर. बालू, तृणमूल काँग्रेसचे डेरेक ओब्रायन, 'आप'चे संजय सिंह, प्रियंका गांधी-वढेरा, सुप्रिया सुळे, कणिमोळी आदी खासदार सहभागी झाले होते. शिवसेनेच्या ठाकरे गटाच्या खासदारांनी अस्सल मराठीमध्ये केंद्रीय निवडणूक आयोगाच्या विरोधात घोषणाबाजी केली. काँग्रेसचे शशी थरूर आणि मनीष तिवारीही मोर्चात दिसले. मोर्चादरम्यान तृणमूल काँग्रेसच्या मिताली बाग, महुआ मोईत्रा या दोघी चक्कर आल्याने खाली पडल्या. समाजवादी पक्षाच्या संजना जाटव यांनाही नंतर रुग्णालयात नेण्यात आले.मोर्चानंतर लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी सरकारवर टीकेची झोड उठविली. "ही लढाई आता केवळ राजकीय राहिलेली नाही.

# डोनाल्ड ट्रम्प यांची मोठी घोषणा

## वॉशिंग्टन डीसी पोलिसांचा ताबा घेतला; आता शेकडो नॅशनल गार्ड तैनात



। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदाची सूत्रे हाती घेतल्यापासून डोनाल्ड ट्रम्प यांनी निर्णयांचा धडाका लावला आहे. ट्रम्प यांनी घेतलेल्या निर्णयांची जगात चर्चा होत आहे. एवढंच काय तर खुद्द अमेरिकेतही डोनाल्ड ट्रम्प यांच्या अनेक निर्णयावर टीका होते. मात्र, तरीही ट्रम्प यांनी अनेक मोठे निर्णय घेतले आहेत. विशेषतः बेकायदा स्थलांतरीतांची घरवापसी आणि इतर देशांवर टेरीफ लागू करण्याची भूमिका. सध्या या निर्णयांची चर्चा आहे.**

असं असतानाच आता डोनाल्ड ट्रम्प यांनी आणखी एक मोठी घोषणा केली आहे.डोनाल्ड ट्रम्प यांनी वॉशिंग्टन डीसी पोलिसांचा ताबा घेण्याची घोषणा केली आहे. त्यामुळे आता या ठिकाणी शेकडो नॅशनल गार्ड तैनात करण्यात येणार आहेत. डोनाल्ड ट्रम्प यांनी हा निर्णय का घेतला? याबाबत अमेरिकेत देखील सवाल उपस्थित केले जात आहेत. ट्रम्प यांच्या नॅशनल गार्डच्या तैनातीवरील निर्णयाबाबत अनेकांनी गंभीर चिंता व्यक्त केली आहे. या संदर्भातील वृत्त हिंदुस्तान टाईम्सने दिलं आहे.वॉशिंग्टनमध्ये

### ट्रम्प यांनी पत्रकारांना काय सांगितलं?

विरोधाला न जुमानता संघीय एजन्सी तैनात करण्यात आल्या होत्या, त्याप्रमाणेच आता डोनाल्ड ट्रम्प यांनी हे पाऊल उचलल्याचं बोललं जात आहे.आज व्हाईट हाऊसमध्ये डोनाल्ड ट्रम्प यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितलं की, "वॉशिंग्टन डीसीमध्ये कायदा, सुव्यवस्था आणि सार्वजनिक सुरक्षा पुनर्संचयित करण्यात मदत करण्यासाठी मी नॅशनल गार्ड तैनात करत आहे.

कायदा आणि सुव्यवस्था पूर्ववत करण्यासाठी शेकडो नॅशनल गार्डस तैनात करण्याची घोषणा ट्रम्प यांनी केली आहे. शेकडो नॅशनल गार्डस तैनात केल्यानंतर त्यांना कोणत्याही अडथळ्याशिवाय त्यांचं कर्तव्य पार पाडण्याची अपेक्षा डोनाल्ड ट्रम्प यांनी व्यक्त केली आहे. तसेच नॅशनल गार्डसला कोणत्याही निर्बंधाशिवाय त्यांची कर्तव्ये पार पाडण्याची परवानगी दिली जाईल, असंही त्यांनी स्पष्ट केलं आहे. डीसी पोलीस विभागाला थेट संघीय नियंत्रणाखाली आणण्यासाठी डिस्ट्रिक्ट ऑफ कोलंबिया होम रुल ॲक्ट लागू करण्याची घोषणा केल्यामुळे ट्रम्प यांचं हे मोठं पाऊल मानलं जात आहे.

# अरिजीत सिंहने गायलं 'जीव रंगला' गाणं, व्हिडीओ झाला व्हायरल

संगीत विश्वातील सध्याचं आघाडीचं नाव म्हणजे अरिजीत सिंह. अरिजीतने आपल्या सुमधूर आवाजाने तरुणाईला अक्षरशः वेड लावलं आहे. त्यामुळेच अरिजीतचा मोठा चाहता वर्ग आहे. त्याचं कुठलंही गाणं असो ते सुपरहिट होतंच. अरिजीत त्याच्या गाण्यांव्यतिरिक्त लाइव्ह कॉन्सर्ट्मुळे खूप चर्चेत असतो.

त्याच्या लाइव्ह कॉन्सर्टला चाहते तुफान गर्दी करतात. नुकताच पुण्यातील एमसीए इंटरनॅशनल स्टेडियममध्ये अरिजीत सिंहचा लाइव्ह कॉन्सर्ट पार पडला. या कॉन्सर्टमधील सध्या अनेक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. विशेष म्हणजे पुण्यातील कॉन्सर्टमध्ये अरिजीत सिंहने मराठी गाणं गायलं; ज्याचा व्हिडीओ सध्या खूप चर्चेत आला आहे.

या व्हिडीओमध्ये अरिजीत सिंह मराठी गाणं गाताना दिसत आहे. राष्ट्रीय पुरस्कार विजेता 'जोगवा' चित्रपटातील 'जीव रंगला' (JEEV RANGLA) गाणं अरिजीत सिंहने गाताना पाहायला मिळत आहे. अरिजीतच्या




गोड आवाजात 'जीव रंगला' गाणं ऐकून अनेकांच्या अंगावर शहारे आले, अशा प्रतिक्रिया उमटल्या आहेत.अरिजीत सिंहचा हा व्हिडीओ १.८ मिलियनहून अधिक जणांनी पाहिला आहे.


या व्हिडीओवर नेटकऱ्यांच्या प्रतिक्रियांचा पाऊस पडला आहे. एका नेटकऱ्याने लिहिलं आहे, "म्हणून अरिजीत सिंह खूप उत्कृष्ट गायक आहे." दुसऱ्या नेटकऱ्याने लिहिलं, "मराठी गाणं खूप छान गातो. गहिवरून आलं." तिसऱ्या नेटकऱ्याने लिहिलं, "काय आवाज आहे आणि जबरदस्त." चौथ्या नेटकऱ्याने लिहिलं की, मराठी गाणं गाऊन लोकांची मनं जिंकली. दरम्यान, याआधीही अरिजीत सिंहने लाइव्ह कॉन्सर्टमध्ये मराठी गाणी गायली होती. तेव्हादेखील त्याने आपल्या गोड आवाजाने चाहत्यांची मनं जिंकली होती. अरिजीत सिंह जसा सध्या मराठी गाणं गायल्यामुळे चर्चेत आला आहे. तसाच सध्या दुसऱ्या बाजूला पंजाबी प्रसिद्ध गायक हनी सिंगदेखील चर्चेत आला आहे.

## गौरी स्प्रॅट आमिरच्या प्रेमात का पडली?

बॉलीवूडमधील लोकप्रिय अभिनेता आमिर खान(AAMIR KHAN) हा सध्या चांगलाच चर्चेत आहे. नुकताच त्याने त्याचा ६० वा वाढदिवस साजरा केला. यादरम्यानच त्याने त्याच्या वैयक्तिक आयुष्याबाबत मोठा खुलासा केला. ६० वर्षीय अभिनेता रिलेशनशिपमध्ये आहे. तो दीड वर्षांपासून नात्यात असल्याचे त्याने म्हटले. तसेच ज्या मुलीला तो डेट करत आहे, तिची ओळखही करून दिली. गौरी असे तिचे नाव असून ते एकमेकांना गेल्या २५ वर्षांपासून ओळखत असल्याचे आमिर खानने स्पष्ट केले. गौरी स्प्रॅट ही मूळची बंगळूरूमधील असून सध्या ती आमिर खानच्या प्रॉडक्शन हाऊसमध्ये काम करत आहे. आता आमिर खानची गर्लफ्रेंड गौरी स्प्रॅटने मीडियाशी संवाद साधला. त्यावेळी तिने ती आमिर खानच्या का प्रेमात पडली, तिने आतापर्यंत आमिर खानचे किती सिनेमे पाहिले आहेत, यावर भाष्य केले. गौरीने आमिर खानचे किती चित्रपट पाहिले आहेत यावर बोलताना म्हटले की, 'लगान' व 'दिल चाहता है' हे दोनच सिनेमे मी पाहिले आहेत. पुढे गौरी आमिर खानबरोबरच्या रिलेशनशिपविषयी बोलताना म्हणाली, "प्रेमळ, काळजी घेणारा जेंटलमन पार्टनर किंवा जोडीदार मला हवा होता" गौरीने असे म्हणताच आमिर खानने तिला विचारले की, "त्यानंतर तू मला शोधलेस का?"

## 'हायवे'साठी आलियाने आधी दिला नकार

सध्याच्या काही आघाडीच्या बॉलीवूड अभिनेत्रींच्या यादीत आवर्जून येणारे नाव म्हणजे आलिया भट्ट (ALIA BHATT). आलियाने तिच्या आजवरच्या कारकिर्दीत अनेक हिट चित्रपट दिले आहेत. त्यापैकीच एक चित्रपट म्हणजे 'हायवे' (HIGHWAY). 'हायवे' हा चित्रपट आलिया भट्टच्या उत्तम चित्रपटांपैकी एक आहे. या चित्रपटात वीरा त्रिपाठीच्या भूमिकेसाठी तिचं खूप कौतुक झालं होतं. या चित्रपटामुळेच ती केवळ उत्तम अभिनेत्री आहे हे सिद्ध झाले. पण, 'हायवे' हा चित्रपट करण्यास आलिया सुरुवातीला घाबरली होती? मग नंतर एका व्यक्तीमुळे तिनं यात काम करण्यास होकार दिला. चित्रपटाचे दिग्दर्शक इम्तियाज अली (IMTIAZ ALI) यांनी याबद्दल नुकतंच वक्तव्य केलं. 'गेम चेंजर्स'साठी कोमल नाहटा यांच्याशी झालेल्या संभाषणात इम्तियाज अली यांनी सांगितलं की, 'हायवे'साठी ते आधी अनुभवी अभिनेत्रीची निवड करण्याचा विचार करीत होते. या भूमिकेसाठी त्यांना तिशीच्या आसपास वय असलेल्या अभिनेत्रीची आवश्यकता आहे. पण १८ वर्षांच्या आलिया भट्टला भेटल्यानंतर त्यांना ती या भूमिकेसाठी परिपूर्ण असल्याचं जाणवलं.इम्तियाज अली यांनी सांगितले, "आलिया तेव्हा १८ वर्षांची असली तरीही तिच्यात पात्राला आवश्यक असलेली भावनिक खोली होती. तिनं तेव्हा जास्त काम केलं नव्हतं आणि मी तिचा 'स्टुडंट ऑफ द इयर' चित्रपटही पाहिला नव्हता; पण ती ज्या पद्धतीनं बोलली, ते खूप आकर्षक होतं. तिच्यात एक गुण होता, जो या चित्रपटासाठी उत्कृष्ट होता. तिच्या याच गुणानं मला खात्री पटवून दिली की, ती या भूमिकेसाठी योग्य आहे."इम्तियाज अली यांनी पुढे सांगितलं की, "महेश भट्ट यांनी 'हायवे' चित्रपटात काम करण्यास आलियाला तयार करण्याची महत्त्वाची भूमिका बजावली होती. मी तिच्या घरी जायचो आणि भट्टसाहेब तिला हे काम करण्यासाठी पटवून देण्याचा प्रयत्न करीत होते. सुरुवातीला ती थोडी घाबरली होती, तिला शंका होती की, ती हे काम करू शकेल की नाही. कारण- हा चित्रपट सोपा नव्हता. पण नंतर तिनं होकार दिलाच."दरम्यान, आलिया भट्टच्या आगामी कामाबद्दल बोलायचं झालं तर, तिचा आगामी चित्रपट 'अल्फा' आहे. या चित्रपटात तिच्याबरोबर शर्वरी वाघदेखील



## सलमानच्या फार्महाऊसवर घालवलेले 3 दिवस

कन्नड अभिनेता किच्चा सुदीपची मुलगी सान्वीने 'दबंग ३' चित्रपटाच्या शूटिंगदरम्यानच्या भाईजानबरोबरच्या आठवणी सांगितल्या आहे. किच्चा सुदीपने 'दबंग ३'मध्ये खलनायकाची भूमिका केली होती. सिनेमाचं शूटिंग सुरू होतं तेव्हा सान्वी १५ वर्षांची होती. ती सलमानची खूप मोठी चाहती होती, त्यामुळे तिच्या वडिलांबरोबर शूटिंगला आली होती. सलमानबद्दल गैरसमज आहेत, तो खूप चांगला आहे, असं सान्वी म्हणाली. 'दबंग ३' सिनेमा २०१९ मध्ये प्रदर्शित झाला होता. या चित्रपटाच्या शूटिंगसाठी वडिलांबरोबर मुंबईत आलेल्या सान्वीचे सलमान खानने खूप लाड केले होते.जिनल मोदीला दिलेल्या एका मुलाखतीत बोलताना २१ वर्षीय सान्वीने सिनेमाच्या शूटिंग्च्या आठवणी सांगितल्या. "जेव्हा पप्पा 'दबंग ३' चित्रपटाचे शूटिंग करत होते, ते माझ्या आयुष्यातील सर्वात मजेदार दिवस होते. मी लहानपणी सलमान खान यांच्यासाठी एक ब्रेसलेट बनवले होते आणि त्यांनी ते बिग बॉसमध्येही घातले होते. त्यामुळे 'दबंग ३' दरम्यान भेटल्यावर ती आठवण ताजी झाली," असं सान्वी म्हणाली.सान्वीने सांगितलं की शूटिंगनंतर तिचे वडील तिला मुंबईला घेऊन गेले आणि ते सलमानच्या घरी जेवायला गेले. सलमानच्या घरी जाणं हे सान्वीला तिच्या वडिलांनी दिलेलं सरप्राइज होतं. "मी त्यांना पाहिलं आणि मी विचार करत होते की अरे देवा, हे तर सलमान सर आहेत. त्या दिवशी त्यांनी माझे खूप लाड केले. त्यांनी मला गाणं गाण्यास सांगितलं. मग मी त्यांच्यासाठी गाणं गायलं," असं सान्वी म्हणाली.त्यांनी पहाटे ३ वाजता एका संगीत दिग्दर्शकाला फोन केला आणि मी हिला तुझ्याकडे पाठवत आहे असं सांगितलं. ते म्हणाले की हिचा आवाज रेकॉर्ड करून ठेव, जर एखाद्या कामासाठी आपल्याला तिच्या आवाजाची गरज भासली तर आपण वापरू. नंतर दुसऱ्या दिवशी मी त्या संगीत दिग्दर्शकाकडे गेले.



## दीपिका पादुकोणच्या 'त्या' लूकने वेधले लक्ष

बॉलीवूडमधील आघाडीची अभिनेत्री म्हणून दीपिका पादुकोण (DEEPIKA PADUKONE)ची ओळख आहे. दीपिका पादुकोणने २००७ साली 'ओम शांती ओम' या चित्रपटातून बॉलीवूडमध्ये पदार्पण केले. शाहरुख खानबरोबरचा हा चित्रपट चांगलाच गाजल्याचे पाहायला मिळाले. या चित्रपटाचे दिग्दर्शन फराह खानने केले होते. त्याआधी अभिनेत्रीने २००६ साली कन्नड चित्रपटसृष्टीत पदार्पण केले होते. 'ऐश्वर्या' असे या चित्रपटाचे नाव होते. अभिनेत्रीने 'यह जवानी है दिवानी', 'चेन्नई एक्स्प्रेस', 'कॉकटेल', 'हॅपी न्यू इयर', 'खेलें हम जी जान से', 'देसी बॉइज', 'लव्ह आज कल' ते 'ब्रह्मास्त्र', 'जवान', 'पठाण', 'सिंघम अगेन', 'फायटर' अशा अनेक गाजलेल्या चित्रपटांत अभिनेत्री प्रमुख भूमिकेत दिसली होती. तर, दीपिकाचा पती व अभिनेता रणवीर सिंग हादेखील चर्चेत असणारा अभिनेता आहे. 'लुटेरा', 'राम लीला', 'बाजीराव मस्तानी', 'बेफिकरे', 'गुंडे', 'दिल धडकने दो', 'पद्मावत', 'सिम्बा', 'गली बॉय', 'सिंघम अगेन', अशा चित्रपटांसाठी तो ओळखला जातो. रणवीर सिंह त्याच्या उत्साहाने नेहमीच सर्वांचे लक्ष वेधून घेतो. तसेच त्यांची अतरंगी कपड्यांची स्टाईल प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेताना दिसत असतात. आता सोशल मीडियावर या सेलिब्रिटी जोडप्याचा एक व्हिडिओ व्हायरल होताना दिसत आहे.

विश्वचषक स्पर्धा

## विश्वचषक जेतेपदाची प्रतीक्षा संपविण्याचा प्रयत्न करू

# ऐतिहासिक कामगिरीची आस!

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारतीय पुरुष क्रिकेट संघाने २०११ साली मायदेशात झालेला एकदिवसीय विश्वचषक जिंकला, तेव्हा मी जेमतेम ११ वर्षांची होते. मात्र, भारताचे जेतेपद निश्चित झाल्यानंतर चाहत्यांनी रस्त्यांवर उतरून केलेला जल्लोष माझ्या कायमचा लक्षात राहिला. चाहत्यांचे हे प्रेम पाहून आपल्यालाही एकेदिवशी विश्वचषक जिंकायचा आहे असे स्वप्न पाहू लागले. आता ती संधी चालून आली आहे. आम्ही घरच्या प्रेक्षकांसमोर सर्वोत्तम कामगिरी करून विश्वचषक जेतेपदाची प्रतीक्षा संपविण्याचा नक्कीच प्रयत्न करू, अशी भावना महिला संघाची मुंबईकर फलंदाज जेमिमा रॉड्रिग्जने व्यक्त केली.**

### २०१७ विश्वचषकाने क्रिकेटला कलाटणी




भारत आणि श्रीलंका येथे यंदा ३० सप्टेंबरपासून महिला एकदिवसीय विश्वचषक स्पर्धा रंगणार आहे. विश्वचषकाचे अनावरण, तसेच स्पर्धेला ५० दिवसांचा कालावधी शिल्लक असल्याच्या निमित्ताने सोमवारी मुंबईत विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याला भारतीय संघाची कर्णधार हरमनप्रीत कौर आणि उपकर्णधार स्मृती मनधाना, माजी कर्णधार मिताली राज, पुरुष संघाचा माजी अष्टपैलू युवराज सिंग, तसेच आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेचे (आयसीसी) अध्यक्ष जय शहा, नवनियुक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संजोग गुप्ता यांच्यासह अन्य मान्यवरही उपस्थित होते. भारतीय महिला संघाने २००५ आणि २०१७ मध्ये एकदिवसीय विश्वचषकाची अंतिम फेरी गाठली होती. मात्र, दोन्ही वेळा त्यांना उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले.

आता घरच्या मैदानांवर खेळताना ऐतिहासिक जेतेपदावर मोहोर उमटविण्याचा निर्धार कर्णधार हरमनप्रीतने व्यक्त केला. "आम्हाला यावेळी अंतिम अडथळा पार करायचा आहे. याची आमच्यासह सर्वच देशवासीय वाट बघत आहेत. विश्वचषक स्पर्धा खूपच खास असतात. त्यातच ही स्पर्धा मायदेशात खेळण्यापेक्षा मोठे काहीच नाही. यात देशासाठी सर्वोत्तम कामगिरी करण्याचा आमचा नक्कीच प्रयत्न असेल. युवी दादाला (युवराज सिंग) मी भारताला विश्वचषक जिंकवून देताना पाहिले आहे. त्याची कामगिरी खूप प्रेरणादायी असून मलाही असेच काही करायला आवडेल," असे हरमनप्रीतने नमूद केले.भारतीय महिला संघाने

### सर्वोत्तम कामगिरीचा प्रयत्न

महिला क्रिकेटच्या प्रसार आणि प्रगतीचा भाग असल्याचा खूप आनंद आहे," असे मनधाना म्हणाली. तसेच माजी कर्णधार मिताली राजनेही अशीच भावना व्यक्त केली.२०१७ विश्वचषकानंतर केवळ भारतातच नाही, तर जागतिक स्तरावर महिला क्रिकेटला कलाटणी मिळाली. समाजमाध्यमांवरही महिला क्रिकेटची चर्चा केली जाऊ लागली. प्रसारणकर्त्यांचाही रस वाढला.

नुकत्याच झालेल्या इंग्लंड दौऱ्यात ट्वेन्टी-२० आणि एकदिवसीय अशा दोन्ही मालिका जिंकण्याची चमकदार कामगिरी केली. त्यामुळे खेळाडूंचा आत्मविश्वास उंचावला असून विश्वचषकासाठी आम्ही पूर्णपणे सज्ज असू, असे भारताची प्रमुख फलंदाज मनधानाने सांगितले. "संघातील वातावरण अतिशय सकारात्मक आहे. खेळाडूंना सर्वोत्तम कामगिरी करण्यासाठी ही गोष्टी महत्त्वाची ठरते. विशेषत: इंग्लंडमध्ये आम्ही क्षेत्ररक्षणात दाखवलेली सुधारणा लक्षवेधी होती. आता आगामी सामन्यांतही अशीच कामगिरी सुरू ठेवली आणि केवळ सर्वोत्तम खेळ करण्यावर लक्ष केंद्रित केले, तर यश आपोआपच मिळेल," असे विश्वास मनधानाने व्यक्त केला. दरम्यान, गेल्या एक-दोन वर्षांत खेळाडूंची मानसिकता आणि सामन्यांसाठीची तयारी यात बराच बदल झाला असून याचा सकारात्मक परिणाम दिसून येत असल्याचेही मत जेमिमा आणि मनधानाने मांडले.भारतीय महिला संघाला २०१७ साली इंग्लंडमध्ये झालेल्या एकदिवसीय विश्वचषकात उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले होते. मात्र, या संपूर्ण स्पर्धेत भारतीय संघाने केलेल्या कामगिरीमुळे, तसेच अंतिम लढतीत यजमान इंग्लंडला अखेरपर्यंत दिलेल्या झुंजीमुळे देशवासीयांचा महिला क्रिकेटकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला, असे भारतीय खेळाडूंना वाटते."महिला क्रिकेट आता प्रगतीपथावर आहे. देशातील महिला क्रिकेटमध्ये गेल्या आठ वर्षांत मोठा बदल पाहायला मिळाला आहे.

# धोनीने चाहत्याच्या पोस्टला दिलं भन्नाट उत्तर

## माहीने त्याच्या गुडघ्याच्या दुखापतीबद्दल मोठा खुलासा केला

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**आयपीएल २०२६ च्या हंगामापूर्वी खेळाडूंच्या ट्रेडबद्दल किंवा इतर संघांमध्ये जाण्याबद्दल मोठ्या चर्चा सुरू आहेत. यादरम्यान महेंद्रसिंह धोनी आयपीएलच्या पुढील हंगामात खेळणार का, हा प्रश्न चाहत्यांच्या मनात कायम आहे. धोनीने देखील गेल्या हंगामात याबाबत काही स्पष्ट उत्तर दिलं नव्हतं. पण धोनीने पुढील हंगामात खेळावं या चाहत्याच्या आग्रहाला धोनीने दिलेल्या उत्तराने सर्वांचं टेन्शन वाढलं आहे.**






कदाचित पुढील हंगामात धोनी खेळण्याची शक्यता कमी असल्याचं त्याच्या वाक्यावरून दिसून येतंय, धोनीच्या गुडघ्याच्या दुखापतीच्या वाक्याने चाहतेदेखील चिंतेत आहेत. धोनीने निवृत्ती न घेता खेळत राहावं अशी प्रत्येक चाहत्याची इच्छा आहे, पण दरम्यान व्हायरल झालेल्या व्हीडिओमध्ये माहीने त्याच्या गुडघ्याच्या दुखापतीबद्दल मोठा खुलासा केला आहे.चेन्नई सुपर किंग्जचा माजी कर्णधार महेंद्रसिंह धोनीचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. एका कार्यक्रमादरम्यान धोनीने आयपीएल

### धोनीला २०२३ पासून त्रास

२०२३ मध्ये चेन्नई संघाने जेतेपद जिंकल्यानंतर धोनी गुडघ्याला पट्टी बांधून विक्ट्री लॅपमध्ये फिरताना दिसला. यानंतर अनेकदा खेळताना धोनीला त्रास होत असल्याचे देखील स्पष्ट दिसले आहे. यामुळे, धोनी आयपीएलमध्येही विकेटदरम्यान धावून फारशा धावा करत नाही आणि त्यामुळे खालच्या फळीत LA फलंदाजीला येतो. धोनीला २०२३ पासून गुडघ्याचा त्रास होता.

२०२६ च्या हंगामात खेळण्याबद्दल वक्तव्य केलं आहे.

धोनी म्हणाला, "पुढच्या हंगामात मी खेळू शकेन की नाही, याबाबत मी आता काहीच सांगू शकत नाही. मी खेळणार की नाही हा निर्णय घेण्यासाठी माझ्याकडे अजून डिसेंबरपर्यंतचा वेळ आहे. मी काही महिने माझ्या फिटनेसवर लक्ष देईन आणि त्यानंतर निर्णय घेईन."धोनीचं बोलून होताच एक चाहता मोठ्याने म्हणाला 'सर तुम्ही खेळलंच पाहिजे', हे ऐकताच धोनीने लगेच उत्तर दिलं. "अरे या गुडघ्यांचं दुखणं कोण बघेल मग?" हे बोलताच धोनीसह सर्वच जण हसू लागले.४४ वर्षीय धोनी गेल्या काही वर्षांपासून गुडघ्याच्या दुखण्याने त्रस्त आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

। मंगळवार ।

। दि. 12 ऑगस्ट 2025।

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती



## क्रांती दिन सप्ताहातून विद्यार्थ्यांमध्ये

# जागविली राष्ट्र भक्तीची प्रेरणा!

## शिक्षण विश्व: संत साई शाळेत क्रांती दिन सप्ताह

। पिंपरी चिंचवड ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**संत साई हायस्कूल भोसरी येथे क्रांती दिन सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असून या निमित्ताने विविध उपक्रम राबविण्यात आले. याच माध्यमातून घेण्यात आलेल्या कार्यक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रभक्तीची प्रेरणा जागृत झाली असे शाळेचे मुख्याध्यापक शिवलिंग ढवळेश्वर म्हणाले.**



संत साई हायस्कूल भोसरी मध्ये गेली 24 वर्ष क्रांती सप्ताह साजरा केला जातो. हे वर्ष संत साई शाळेत कृतज्ञता वर्ष म्हणून साजरे केले जात आहे. यावर्षी क्रांती दिना निमित्त शालेय विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संरक्षणाची भावना जागविण्या सोबतच त्यांच्या चारित्र्य निर्मितीमध्ये महत्त्वाची भूमिका आहे म्हणून पर्यावरण रक्षकांप्रती विशेष कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.निसर्ग संवर्धनासाठी पर्यावरण संरक्षकांची जाणीव या कार्यक्रमातून सर्वांना करून देण्यात आली. निसर्गाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली अनेक निसर्ग रक्षकांबद्दल माहिती देण्यात आली.

कार्यक्रमाची सुरुवात भारत मातेच्या प्रतिमेचे पूजन करून झाली. शाळेचे मुख्याध्यापक शिवलिंग ढवळेश्वर व प्रमुख पाहुणे 'ग्रीन आर्मी 'चे संस्थापक प्रशांत राऊळ यांच्या हस्ते मशाल पेटवून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात झाली. पाहुण्यांची ओळख शुभांगी सुतार यांनी करून दिली. सूत्रसंचालन सातवी मधील विद्यार्थिनी अन्वी फुगे आणि आरोही शिंदे यांनी केले तसेच आभार प्रदर्शन अन्वी फुगे या विद्यार्थीनीने केले.

या निमित्ताने शाळेत शेतकऱ्या बद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी 'शेतकरी गीत' सादर करण्यात आले. पर्यावरणावर आधारित 'चिपको आंदोलना 'वर एक नाटिका प्रस्तुत करण्यात आली व 'धरती करे पुकार' हे पथनाट्यही विद्यार्थ्यांनी सादर केले. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना "पर्यावरणाचे संरक्षण करणे सर्वांची जबाबदारी आहे प्रत्येकाने छोट्या छोट्या गोष्टीतून पर्यावरण संरक्षण करणे गरजेचे आहे. पर्यावरण रक्षणासाठी आदर्शाचा वारसा पुढे नेण्यासाठी घराघरातून प्रयत्न करणे आवश्यक आहे ती प्रत्येकाची जबाबदारी आहे. "असे विचार उपस्थित त्यांनी व्यक्त केले.

संत साई हायस्कूल मध्ये क्रांती दिनानिमित्त या विशेष कार्यक्रमामधून पर्यावरणाबद्दल, निसर्गाबद्दल विविध कार्यक्रम सादर करण्यात आले विद्यार्थ्यांनी पर्यावरण रक्षणासाठी शपथ घेतली. वंदे मातरम ने कार्यक्रमाची सांगता झाली. या कार्यक्रमाला शाळेचे मुख्याध्यापक ढवळेश्वर , मुख्याध्यापिका सुनीता ढवळेश्वर , उपमुख्याध्यापिका रूपाली खोल्लम, शाळेच्या विश्वस्त पायल ढवळेश्वर,स्वाती गोसावी ,प्रगती कोटूळे , मनोज वाबळे, प्रमोद शिंदे , संजय अनारथे , पालक शिक्षक संघाचे प्रतिनिधी तसेच सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व पालक उपस्थित होते.



# पिंपरी महापालिकेच्या नव्या प्रशासकीय इमारतीचे 62 टक्के काम पूर्ण!

## सर्व नागरी सेवा एकाच ठिकाणी मिळणार; 91 हजार चौरस मीटरमध्ये अत्याधुनिक ग्रीन बिल्डिंग

। पिंपरी चिंचवड ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड : पिंपरी चिंचवड शहरातील नागरिकांना महापालिकेच्या सर्व सुविधा एकाच छताखाली देण्याच्या महत्त्वाकांक्षी उद्देशाने उभारण्यात येत असलेल्या पिंपरी चिंचवड महापालिकेच्या नवीन प्रशासकीय इमारतीच्या बांधकामाला गती मिळाली आहे. जानेवारी २०२३ मध्ये सुरू झालेल्या या प्रकल्पाचे महत्त्वाचे टप्पे पूर्ण झाले आहेत. या इमारतीचे सद्यस्थितीत ६२ टक्के काम पूर्ण झाले असून उर्वरित काम देखील प्रगतीपथावर आहे.**



महापालिकेने हा प्रकल्प ३६ महिन्यांत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाच्या माध्यमातून उभारण्यात येणाऱ्या पर्यावरणपूरक इमारतीमध्ये महापालिकेची सर्व कार्यालये एकाच ठिकाणी केंद्रीभूत करणे, नागरी सेवा अधिक सुलभ करणे आणि प्रशासनाची कार्यक्षमता वाढवणे हा मुख्य उद्देश आहे.

महापालिकेच्या नवीन इमारतीचे तळघरातील तीन मजले आणि तिसऱ्या मजल्यापर्यंतचे बांधकाम सध्या पूर्ण झाले आहे. पूर्णत्वास आल्यानंतर ही इमारत नागरी सेवा केंद्र, बहुउद्देशीय हॉल, संग्रहालय, प्रदर्शन हॉल आणि ई-गव्हर्नन्स सेंटर सारख्या अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ज असणार आहे. ही प्रशासकीय इमारत ८.६५ एकरच्या विस्तृत भूखंडावर उभी राहत असून, एकूण ९१ हजार ४५९ चौरस मीटर बांधकाम क्षेत्रामध्ये विकसित केली जाणार आहे. या प्रकल्पासाठी सुमारे ३१२.२० कोटी खर्च अपेक्षित आहे. शाश्वत विकासाच्या दृष्टीने ही इमारत इंटिग्रेटेड हॅबिटॅट असेसमेंटसाठी ५ स्टार ग्रीन रेटिंग आणि आयजीबीसी प्लॅटिनम रेटिंग मिळवण्याच्या दृष्टीने विकसित करण्यात येणार आहे. सौरऊर्जा, पाणी पुनर्वापर प्रणाली आणि ग्रीन स्पेसेस यांसारख्या वैशिष्ट्यांमुळे पर्यावरणपूरक वातावरण टिकवून ठेवण्यास देखील मदत मिळणार आहे.

> “ पिंपरी चिंचवड महापालिकेच्या नवीन प्रशासकीय इमारतीमुळे नागरिकांना अधिक सोयीस्कर सेवा मिळतील. अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि पर्यावरणपूरक उपाययोजनांच्या मदतीने ही इमारत केवळ प्रशासकीय केंद्रच नव्हे, तर शाश्वत विकासाचे प्रतीक ठरेल. आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड महानगरपालिका
> — **शेखर सिंह,** अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका

### प्रमुख वैशिष्ट्ये:

इमारतीची रचना : ६ ते १८ मजल्यांचे चार विंग, प्रत्येकी ३ तळघरे
नवीन सुविधा : नागरी सेवा केंद्र, बहुउद्देशीय हॉल, ई-गव्हर्नन्स सेंटर, ग्रंथालय, क्लिनिक इत्यादी

**तळमजल्यावरील महत्त्वाच्या सुविधा :**
वाचनालय : १२५ चौरस मीटर
प्रदर्शन हॉल/संग्रहालय : ३८० चौरस मीटर
बहुउद्देशीय हॉल : ५७० चौरस मीटर

> “ नवीन प्रशासकीय इमारतीमुळे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सेवांचा विस्तार अधिक सुलभ आणि गतिमान होईल. अत्याधुनिक सुविधा आणि एकाच ठिकाणी केंद्रीभूत कार्यालयांमुळे नागरिकांना अधिक जलद आणि प्रभावी सेवा मिळतील. हा प्रकल्प महानगरपालिकेच्या कार्यक्षमतेत लक्षणीय सुधारणा घडवेल.
> —**विजयकुमार खोराटे,** अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका

> “ नवीन प्रशासकीय इमारतीच्या यशस्वी पूर्ततेसाठी योजना आखण्यापासून ते अंमलबजावणीपर्यंत प्रत्येक टप्प्यावर काटेकोर देखरेख ठेवण्यात येत आहे. बांधकामातील गुणवत्ता, सुरक्षितता, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि वेळेत प्रकल्पाचे काम पुर्ण करण्यावर भर दिला जात आहे. महापालिकेचे हे मुख्यालय केवळ प्रशासकीय सेवांचे केंद्र म्हणून नव्हे, तर या परिसरातील मोठ्या प्रमाणातील नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांसाठी एक आदर्श आणि दिशादर्शक ठरणार आहे.
> — **प्रमोद ओंभासे,** मुख्य अभियंता, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

# सामाजिक विषमता दूर करण्याची जबाबदारी युवा पिढीवर

## डॉ. वंदना बोकील: प्रतिभा महाविद्यालयात महिला सशक्तीकरणावर कार्यशाळा

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**विद्यार्थ्यांनी शिक्षण घेत असतानाच समाजातील वास्तव्याची जाणीव करून घ्यावी.समाजात खूप सुधारणा झाली पण खरोखर स्त्री पुरुष समानता झाली आहे का ? महिला सुरक्षितता आहे का ? याचा विचार युवा पिढीने केला पाहीजे असे मत ज्येष्ठ विचारवंत डॉ . वंदना बोकील यांनी व्यक्त केले.**




चिंचवड येथील कमला एज्युकेशन सोसायटी संचलित प्रतिभा महाविद्यालयातील महिला कल्याण समिती यांच्या वतीने व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या गुणवत्ता सुधारणा कार्यक्रमांतर्गत महिला विकास व सशक्तीकरण या विषयावर कार्यशाळेचे आयोजन, संस्थेचे संस्थापक, सचिव डॉ. दीपक शहा यांचे प्रोत्साहन तसेच संस्थेच्या खजिनदार डॉ . भूपाली शहा व संचालिका डॉ. तेजल शहा यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. त्यावेळी भाषा व साहित्य क्षेत्रातील विचारवंत डॉ . वंदना बोकील याचे स्त्री म्हणून जगताना या विषयावर व्याख्यान आयोजीत करण्यात आले होते. त्यावेळी त्या बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. क्षितिजा गांधी समवेत व्यासपीठावरती खेळ व फिटनेस क्षेत्रातील तज्ञ व प्रमुख पाहुण्या अभिश्री राजपूत, विभाग प्रमुख डॉ. अनामिका धोष , डॉ. रूपा शहा , कार्यक्रमाच्या संयोजिका प्रा. मधुरा वाघ आदी उपस्थित होत्या. यावेळी व्याख्यातांचा सत्कार प्रभारी प्राचार्या डॉ . क्षितीजा गांधी यांच्या हस्ते करण्यात आला. महाविद्यालयातील उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. बोकील पुढे म्हणाल्या, मुला मुलींनो तुम्ही तरुण आहात ,आज शिक्षण घेत असतानाच तुम्हाला समाजातील वास्तव्याची जाणीव व्हावी म्हणून सांगते,समाजात खूप सुधारणा झाली पण खरोखर झाली आहे का ? सुरक्षितता आहे का ? याचा विचार युवा पिढीने केला गेला पाहीजे . यासाठी दोन्ही बाजूनी काय केले पाहिजे याचा विचार करण्याची आज आवश्यकता आहे.

मुलांना सुद्धा स्त्री म्हणून स्त्री ही माणूस आहे याची जाणीव होणे महत्त्वाचे आहे. तर मुलीना आपण स्त्री असलो तरी सुद्धा, आपण एक सक्षम माणूस आहे हे कळले पाहिजे. स्त्री म्हणून जगत रहाल तर भीती, दडपण यातच जगत रहाल. ही दडपणे प्रत्येक मुलीनी आधी मनातून दूर केली पाहिजे, असे डॉ. बोकील म्हणाल्या.

DYP DR. D. Y. PATIL EDUCATIONAL COMPLEX, AKURDI, PUNE

# Dr D Y Patil Educational Complex, Akurdi, Pune

*Approved by AICTE, DTE, MSBTE & Govt. of Maharashtra,*
*Accredited by NBA & Grade Status by NAAC, Affiliated to Savitribai Phule Pune University*

41 YEARS Academic Excellence

**ADMISSIONS OPEN 2025-26**

## Experience D Y Patil Educational Complex



**15k+** Students Placed

**52 LPA** Highest Package

**50,000+** Alumni

**1000+** Empanelled Recruiters

**150+** University Toppers

## Our Institutes

### D Y Patil College of Engineering (Autonomous)
***NRI Quota Open: AY 2025 – 26***
Accredited by NAAC with 'A' Grade & NBA
*UG – Comp / Mech / IT / E&TC / AIDS / Civil / Instrumentation & Control / R&A*
*PG – Comp / E&TC (VLSI/ES) / Civil (C&M/Env) / Mech (Design) / R&A*
*PhD – Mech / E&TC / Civil*

### D Y Patil Institute of MCA & Management
Accredited by NAAC with 'A' Grade & Affiliated to SPPU
*MCA / MBA / PhD (Management)*

### Dr D Y Patil College of Architecture
Accredited by NAAC with 'A' Grade & Approved by COA
*B Arch / M Arch (Construction Management) / D Arch*

### D Y Patil PGDM Institute, Akurdi, Pune
***NRI Quota Open: AY 2025 – 26***
Approved by A.I.C.T.E., New Delhi & Recognized by Govt. of Maharashtra
*Specializations: Marketing / Human Resource / Finance / Logistics & Supply Chain / Business Analytics / Innovation & Entrepreneurship / Agri Business / Pharma & Healthcare Management*

### Dr D Y Patil College of Agriculture Business Management
Affiliated to Krishi Vidyapeeth, Rahuri & Recognized by MCAER, Pune
*BSc (Hons) Agri Business Management*

### Dr D Y Patil College of Pharmacy
Affiliated to SPPU & Approved by PCI New Delhi
Accredited by NBA & NAAC with 'A+' GRADE
*D Pharm / B Pharm / Pharm D / M Pharm (Phcol) / M Pharm (Pharmaceutics) / M Pharm (DRA) / M Pharm (PQA) / M Pharm (Pchem) / M Pharm (PP) / PhD*

### Dr D Y Patil Institute of Pharmacy
Affiliated to MSBTE, Mumbai & Approved by PCI New Delhi
*D Pharm*

### Y B Patil Polytechnic
Approved by AICTE, Affiliated to MSBTE & Recognized by D.T.E. Maharashtra
*Diploma in Civil / Mech / Comp / E&C (Accredited by NBA)*

## Campus at a Glance

- Beautifully landscaped lush green campus
- Virtual Lab Nodal Centre of IIT Bombay
- Digital Classrooms & Libraries
- Online Teaching Learning Platforms
- Highly Qualified & Experienced Faculty
- Outstanding academic results
- Collaboration with International Universities
- Wi-Fi enabled campus / ERP Enabled Administration
- Extravagant Cafeterias & Sports Complex
- Ultra-modern Auditoriums, Seminar Halls
- Conducive & disciplined environment
- Incubation & Startup ecosystem
- State-of-the-Art Hostel for Girls & Boys

## Corporate Relations & Placement Cell

- Strong Alumni engagement
- Internship Opportunities in Industry
- Industry-Centric Training Programs
- International Placement Opportunities
- Notable Placement Record
- Employability Assessment Test conducted by SHL for students (First year to Final Year)
- Corporate Tie-ups & Partnerships with industry for student enrichment activities
- Participation of students in Hackathons & competitions organized by Industries
- Thrust on Personality Development, Soft Skills & Communication Skills in English in Language Laboratories

## Collaborations with Industry (MOU's & COE's)

Jendamark, wipro, NTT DATA, virtusa, B&R, Emcure, KNORR-BREMSE, NuLife, CitiusTech, SHL, McKinley Rice, bvc, Technouniq, RPG, Constrologix, NASSCOM FOUNDATION, INDOVANCE, Tech Mahindra, DataTech Labs, EMERSON, newgen

SECTOR NO. 29, NIGDI PRADHIKARAN, AKURDI, PUNE 411044, MAHARASHTRA, INDIA
www.dypakurdipune.edu.in admission@dypakurdipune.edu.in @dypakurdipune
9373775038 / 9607957618 / 9075345011 / 9158195999

REGISTER HERE

**"Discover, Learn, Lead—The D Y Patil Way."**